वाचले :- १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३
२) आदेश क्र. लेखा/१अ/कावि/११२५/२०१७ दि. ०७/०१/२०१७
३) भारत सरकार, वित्त विभागाचे पत्र क्र. १/३/२००८- E.II(B) दिनांक ११/०९/२०१८
४ कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र कास/२/कावि/२२/२०१७ दि.६/१/२०१७ अन्वये दिलेला अभिप्राय
५) मा .आयुक्त यांचेकडील दिनांक ०८/१०/२०१८ चा मान्य प्रस्ताव
६ मा .आयुक्त यांचेकडील दिनांक ८ /११ /२०१९ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग १२४४
क्र. लेखा/१अ/कावि/११५५/२०१९
दिनांक :- ०८/११ /२०१९
११/११/२०१९

**विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०१९ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...**

आदेश,

केंद्रशासनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन क्रमांक१/३/२००८ E.II(B) दि.२५/१०/२०१९ अन्वये केंद्र सरकारचे ज्या कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या नाहीत, त्या केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०१९ पासून १५४ टक्के वरुन १६४ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०१९ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ०८/१०/२०१८ च्या मान्य प्रस्तावान्वये म.न.पा. नियमित कर्मचा-यांबरोबर सेवानिवृत्त कर्मचारी यांना सुध्दा महागाई भत्ता वाढ मंजुर करणे बाबत मान्यता दिली आहे.

Scanned by CamScanner

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना सुध्दा केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जुलै २०१९ पासून सहावा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन सरंचनेतील वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्ता १५४ टक्के ऐवजी १६४ टक्के प्रमाणे लागू करण्यात येत आहे. माहे नोव्हेंबर २०१९ चे वेतन व पेन्शन बिल १६४ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. तसेच माहे जुलै २०१९ ते ऑक्टोंबर २०१९ पर्यंत देय महागाई भत्याची थकबाकी माहे नोव्हेंबर २०१९ चे वेतन देयका / पेन्शन बिला बरोबर काढण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

सर्व संबंधित शाखाप्रमुख

प्रत :-

१) आयुक्त कक्ष
२) मा. अति आयुक्त कक्ष
३) मा.मुख्यलेखापरिक्षक
४) मा. कामगार कल्याण अधिकारी
५) मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी
६) महा. आयुक्त , प्रशासन

२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

२/- माहिती साठी सादर

मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

Scanned by CamScanner